रविवार सातारा, १२ फेब्रुवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव ग्रंथालय

# डी. पी. भोसले कॉलेजमध्ये उद्यापासून आंतरराष्ट्रीय परिषद

**सातारा, ता. ११ :** येथील डी. पी. भोसले कॉलेजमधील मराठी, हिंदी व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'शोषितांचे साहित्य : जागतिक परिप्रेक्षेप', तसेच इतिहास व भूगोल या विषयाच्या वतीने 'जागतिक स्तरावरील समस्यांचा भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टिकोन' या विषयावर सोमवार (ता. १३) व मंगळवारी (ता. १४) दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन समारंभ ज्येष्ठ समीक्षक प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. परिषदेसाठी डॉ. सुशीला ओडियार (रशिया), सामाजिक कार्यकर्त्या डॉ. गेल ऑमवेट, डॉ. अमीर हुसेन (बांग्लादेश), डॉ. रवींरंजन सेन (कोलकता विद्यापीठ), डॉ. रामकुमार (हरियाना), डॉ. संतोष पाधी (ओरिसा), डॉ. भालचंद्र शिंदे (गुलबर्गा), डॉ. यशपाल भिंगे (नांदेड), डॉ. अलका मटकर (मुंबई), डॉ. गजानन चव्हाण (पुणे), प्रदीप देशपांडे (मुंबई) आदी विचारवंत या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, परिषदेचे समन्वयक डॉ. सतीश सायकर, डॉ. विजय पाडळकर यांनी दिली.